# झोपडपट्टीवासीयांना ३०५ चौरस फुटांचे घर!

## मुख्यमंत्री लवकरच योजना जाहीर करण्याचे संकेत

संदीप आचार्य/ निशांत सरवणकर



■ विकास नियंत्रण नियमावली ३३ (१०) ही झोपु योजनांसाठी लागू आहे. केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरू नागरी पुनर्निर्माण योजनेनुसार २६९ चौरस फुटांची घरे देण्याचे बंधनकारक होते. याआधी २२५ चौरस फुटांचे घर मोफत दिले जात होते.

**६० टक्क्यांहून अधिक** भाग झोपडपट्टीने व्यापलेल्या मुंबईतील झोपुवासीयांना यापुढे आणखी मोठे घर मिळणार आहे. प्रस्तावित निर्णयानुसार झोपुवासीयांना ३०५ चौरस फूट कार्पेट आकाराचे घर मिळणार आहे. यावर फंजिबल चटई क्षेत्रफळ उपलब्ध करून देण्याचेही विचाराधीन असून तसे झाल्यास झोपुवासीयांना आणखी ३५ टक्के मोठे घर मिळू शकेल. झोपुवासीय हा सर्वच राजकीय पक्षांचा जिव्हाळ्याचा विषय असल्यामुळे राज्यातील विद्यमान भाजपप्रणीत शासनाकडूनही झोपुवासीयांना मोठे घर देण्याची घोषणा करून राजकीय फायदा उठविण्याचा प्रयत्न केला जाण्याची शक्यता आहे. येत्या एक-दोन दिवसांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस याबाबत योजना जाहीर करतील, असे विश्वसनीय सूत्रांनी सांगितले.

पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत '२०२२ पर्यंत सर्वांसाठी घरे' या योजनेशी राज्याचे धोरण सुसंगत असावे, या दृष्टिकोनातून हा निर्णय घेण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वतः याबाबत अधिवेशनात घोषणा करतील, अशी शक्यता आहे. १९९५ मध्ये शिवसेनाप्रणीत शासनाने झोपु योजनेत २२५ चौरस फुटांचे घर देऊ केले. सध्या या योजनेत २६९ चौरस फूट आकाराचे घर दिले जाते. आता झोपुवासीयांना ३०५ चौरस फुटांचे घर देण्यात येणार आहे. या दिशेने झोपु प्राधिकरणाकडून व्यवहार्य अहवाल मागविण्यात आला होता. त्यानंतरच हा निर्णय घेण्यात आल्याचेही सूत्रांनी सांगितले. झोपु योजनांमध्ये झोपुवासीयांच्या पुनर्वसनासाठी जितके क्षेत्रफळ वापरले जाते तेवढे क्षेत्रफळ विकासकाला खुल्या विक्रीसाठी मिळते. या निर्णयामुळे विकासकांच्या विक्री करावयाच्या क्षेत्रफळातही वाढ होणार आहे.

सध्या सुरू असलेल्या व स्वीकृत झालेल्या विविध योजनांतील व्यवहार्यताही तपासण्यात आली आहे. प्राधिकरणाकडे दाखल असलेल्या १९४१ योजनांपैकी १५०९ योजना स्वीकृत आहेत. या धोरणानुसार ज्या झोपु योजनांना बांधकाम सुरू करण्याचा दाखला (सीसी) देण्यात आला आहे त्या योजनांबाबत २६९ ते ३०५ चौरस फूट असे रूपांतर करावे लागेल. नवीन योजना वाढीव क्षेत्रफळानुसार दाखल करून घ्याव्या लागणार आहेत. ज्या पात्र झोपडीधारकांचे अद्याप पुनर्वसन होऊ शकलेले नाही अशा सर्व झोपडीधारकांना सुधारित निकष लागू राहणार आहेत, असेही या प्रकरणी स्पष्ट करण्यात आले आहे. वाढीव ३६ चौरस फुटांचे क्षेत्रफळ देताना झोपडपट्टी परिसराची घनता, प्रचलित धोरणानुसार झोपडपट्टीखाली जमिनीवर उपलब्ध होऊ शकणाऱ्या सदनिका, इमारतींची संभाव्य उंची व त्या अनुषंगाने आवश्यक परवानग्या, पुनर्वसन घटकाचे बांधकाम वाढल्याने त्याचे विक्री घटकात होणारे संभाव्य परिणाम आदींचा विचार केल्यानंतरच या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

तूर्तास ही योजना मुंबईसाठी लागू करण्यात येणार आहे. या नव्या धोरणाच्या परिणामांचा होणारा अभ्यास करून नंतर पुणे आणि पिंपरी-चिंचवड तसेच ठाणे शहरासाठी ही योजना लागू करण्यात येणार आहे.

# वृद्धेच्या मृत्यूचे कारण गुलदस्त्यात

**मुंबई :** ओशिवरा येथील बेलस्कॉट इमारतीतून रविवारी पोलिसांना आशा सहानी(६३) यांचा सांगाडा सापडला. पोलिसांना त्यांच्या घरात एक चिठ्ठी सापडली असून, त्यात आपल्या मृत्यूस कोणालाही जबाबदार धरू नये, असे नमूद केले आहे. ही चिठ्ठी त्यांनी अमेरिकेत वास्तव्यास असलेल्या आपल्या मुलाला उद्देशून लिहिल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

सॉफ्टवेअर अभियंता असलेला मुलगा ऋतूराज रविवारी मुंबईत घरी आला तेव्हा आईचा सांगाडा घरी सापडला. या प्रकरणी ओशिवरा पोलिसांनी अपघाती मृत्यूची नोंद करत चौकशी व तपास सुरू केला.पोलिसांनी पुन्हा आशा यांच्या घराची झाडाझडती घेतली तेव्हा त्यांनी लिहिलेली चिठ्ठी सापडली. पोलीस उपायुक्त परमजितसिंग दहिया यांनी त्यास दुजोरा दिला. आशा यांचा 'व्हिसेरा' कलिना न्यायवैद्यक प्रयोगशाळेत पाठविण्यात आला आहे. त्यातून यांच्या मृत्यूचे नेमके कारण, त्यांनी आत्महत्या केली का, त्यांचा मृत्यू नेमका कधी झाला हे स्पष्ट होणार आहे.

# बालिकेवर शाळेत लैंगिक अत्याचार

## शिपायाला अटक; शाळा प्रशासनाचा माफीनामा

खास प्रतिनिधी, मुंबई

**मालाड पूर्वेकडील** एका आंतरराष्ट्रीय शाळेत शिकणाऱ्या ४ वर्षांच्या बालिकेवर लैंगिक अत्याचार झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी दिंडोशी पोलिसांनी शाळेतील शिपायाला मंगळवारी अटक केली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी शाळेत हा गुन्हा घडला. शौचालयापर्यंत सोडण्यासाठी गेलेल्या शिपायाने या विद्यार्थिनीवर अत्याचार केल्याचे तपासात पुढे आले आहे.

शनिवारी शाळेतून घरी गेल्यानंतर या बालिकेला त्रास होऊ लागला. तिने आईला घडला प्रकार सांगितला. आईने तात्काळ दिंडोशी पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा नोंदवून शिपायाला अटक केली. शाळेतील सीसीटीव्हीत शिपाई या बालिकेला शौचालयात नेताना दिसतो, असे पोलीस सांगतात. दरम्यान, या घटनेला वाचा फुटताच संतापलेल्या पालक वर्गाने शाळेबाहेर गर्दी केली. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत पालकांनी प्रश्न उपस्थित केले. यावेळी दिंडोशी पोलिसांनी मध्यस्थी करत पालकांची समजूत काढली. शाळा प्रशासनाने घडल्या प्रकाराबद्दल खेद व्यक्त करत समस्त पालक वर्गाची माफी मागितली. या घटनेमुळे शाळेतील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे.

### ११ ऑगस्टपर्यंत कोठडी

अटकेत असलेल्या आरोपीला न्यायालयाने ११ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी दिली आहे. त्याच्याकडे कसून चौकशी सुरू असल्याचे पोलीस उपायुक्त विनयकुमार राठोड यांनी सांगितले.

# पर्यटनाला गती देण्यासाठी पाच बंदरांचा विकास

## केंद्रीय जलवाहतूक मंत्रालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय

विशेष प्रतिनिधी, मुंबई

**देशातील पर्यटनाला** गती देण्यासाठी जलवाहतुकीचा पर्याय समोर आला आहे. यासाठी पहिल्या टप्प्यात पाच बंदरांचा विकास करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय केंद्रीय जलवाहतूक मंत्रालयाने घेतला आहे. देशातील क्रूझ पर्यटनामुळे जलवाहतूक क्षेत्रातील उत्पन्न ७१२ कोटींहून ३५ हजार ५०० कोटींवर जाणार आहे. अडीच लाख तरुणांना रोजगार संधी उपलब्ध होणार आहे.

देशात सागरी किनाऱ्यांवर आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा उपलब्ध केल्यास देशातील जलपर्यटनाला चालना मिळेल यासाठी काय प्रयत्न केले पाहिजेत याचा याचा दिशादर्शक अहवाल नुकताच तयार झाला आहे. या अहवालानुसार देशात आज दोन लाख क्रूझ पर्यटक भेट देतात. येत्या पाच वर्षांच्या काळात ही संख्या चाळीस लाखांपर्यंत पोहोचू शकते. यापैकी ८० टक्के पर्यटक मुंबई बंदराला अधिक पसंती दर्शवतील आणि प्रवाशांमध्ये ७० टक्के प्रवासी हे भारतीय नागरिक असतील असेही या अहवालात नमूद करण्यात आले आहे. यामुळे देशातील जलवाहतूक क्षेत्राला नवी दिशा मिळणार आहे. या जोडीला पर्यटनालाही चालना देण्यात येणार असून यातूनही उत्पन्नात वाढ होणार आहे. यामुळे जलवाहतूक विभाग व पर्यटन विभाग एकत्रित येऊन नियोजन करत आहेत. जलवाहतुकीसाठी देशात काही वर्षांपूर्वी धोरण आखण्यात आले होते. मात्र त्यातील काही त्रुटी आणि प्रशासकीय दिरंगाईमुळे या धोरणाची अंमलबजावणी होऊ शकली नाही. मात्र आता याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचे केंद्रीय जलवाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी सांगितले. मंगळवारी मुंबईत 'भारतात क्रूझ पर्यटनाचा उदय' या विषयावर एका परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी गडकरी बोलत होते. देशात क्रूझ का येत नाही याचा सखोल अभ्यास करून त्यातून मार्ग काढत आम्ही कामाला सुरुवात केली आहे. यामुळे येत्या काळात देशातील साडेसात हजार किलोमीटरचा सागरी मार्ग आणि २० हजार किलोमीटरचा नदीमधील मार्ग वाहतुकीसाठी खुला होणार आहे. यामध्ये परदेशी जलवाहतुकीबरोबरच स्थानिक जलवाहतुकीलाही चालना मिळणार असल्याचे गडकरी म्हणाले.

### मुंबईसह राज्यातील पर्यटनाला फायदा

पाच वर्षांत होणारा जलवाहतुकीच्या विस्ताराचा फायदा मुंबईसह राज्यातील पर्यटनाला होणार आहे. पाच वर्षांमध्ये देशातील पाच प्रमुख बंदरांवर ९५५ जहाजे येतील असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. यातील ८० टक्के जहाजे मुंबई बंदरावर येणार आहेत. पर्यटक बंदरावर आल्यावर त्यांना मुंबईसह नागपूर, नाशिक, पुणे येथील पर्यटन स्थळांना भेटी देण्यासाठी विशेष सहलींचे आयोजन केले जाणार आहे. याचा फायदा राज्यातील पर्यटनाला होईल , असे पर्यटनमंत्री जयप्रकाश रावल यांनी सांगितले. राज्यात स्थानिक जलवाहतूक सुरू करण्यात येणार असल्यामुळे 'नाव से गाव' हे स्वप्न साकार करणे शक्य होणार असल्याचेही ते म्हणाले.

### नोव्हेंबरमध्ये मुंबई-गोवा क्रूझ सेवा

स्थानिक क्रूझ पर्यटनाला कसा प्रतिसाद मिळतो व सेवेमध्ये काय त्रुटी येतात. यासाठी प्रायोगिक तत्त्वावर छोट्या सहलींचे आयोजन करण्यात येणार आहे. यामध्ये नोव्हेंबर महिन्यात मुंबई-गोवा क्रूझ सेवा सुरू होणार आहे. याचबरोबर भविष्यात मुंबई-कोची-मालदिव, मुंबई-अंदमान क्रूझ सेवा सुरू करण्याचा मानस या वेळी व्यक्त करण्यात आला.

- महत्त्वाच्या बंदरांमधील दरांमध्ये ४० टक्के सवलत.
- महत्त्वाच्या पाच बंदरांवर ई-व्हिसा आणि ई-लॅण्डिंग कार्ड.
- क्रूझ चालविण्यासाठी आवश्यक त्या परवानग्या मिळवण्यासाठी एक खिडकी योजना.
- मुंबईत ३०० कोटींचे अत्याधुनिक बंदर .
- प्रवासी जहाज आणि मालवाहतूक जहाज यांच्यासाठी प्रति टन दर आकारला जात असे. आता प्रवासी जहाजासाठी प्रति माणशी १६०० रुपये इतका दर आकारला जाणार आहे.

### वस्तू व सेवा करात सवलत

देशात क्रूझ सेवा पुरविण्यासाठी परदेशी कंपन्यांना निमंत्रित केले जाणार आहे. मात्र या सेवेला वस्तू व सेवा करातून पूर्णपणे वगळल्यास आम्ही आमच्या क्रूझ देशात आणू असे मत जागतिक जलवाहतूक क्षेत्रात ४२ टक्के हिस्सा असलेल्या कार्निव्हल क्रूझ या कंपनीचे मुख्याधिकारी डेविड डिंगल यांनी सांगितले. याचबरोबर प्राप्तिकरातही सवलत मिळण्याची मागणी त्यांनी केली. देशात आंतरराष्ट्रीय दर्जाचे बंदर उभारणे आवश्यक असून तेथे पर्यटकांना आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक असेल असेही ते म्हणाले.

# मोबाइल चोरणारी टोळी अटकेत

**मुंबई :** रात्रीच्या वेळी रस्त्याच्या कडेला विश्रांतीसाठी थांबलेल्या रिक्षा-टॅक्सीसह ओला-उबर चालकांना चाकूचा धाक दाखवून त्यांचे मोबाइल लुटणाऱ्या सहा अल्पवयीन मुलांच्या टोळीला दिंडोशी पोलिसांनी ताब्यात घेतले. या मुलांकडून सव्वासहा लाख रुपये किमतीचे सुमारे ७५ ॲन्ड्रॉईड फोन हस्तगत करण्यात आले. अमलीपदार्थांची नशा करण्यासाठी ही मुले अशाप्रकारे लूटमार करत होती, तसेच मोबाइल विकत घेणारे दुकानदार त्यांना चोरी करण्यास प्रोत्साहित करत होते, अशी धक्कादायक माहिती चौकशीतून पुढे आली आहे.

या सहा जणांसोबत महोम्मद शहाबुद्दीन मन्सुरी (२९) आणि मुबारक खजोरिया(२०) या दोघांना अटक करण्यात आली आहे. यापैकी मुबारक दुकानदार असून या मुलांनी चोरलेले मोबाइल तो विकत घेत असे, असे पोलिसांनी सांगितले.

**टाटा मेमोरिअल हॉस्पिटल रुग्णांची काळजी घेण्यासंबंधित नवीन पाठ्यक्रम सुरू करीत आहे**

**टाटा मेमोरिअल हॉस्पिटल**
**(टाटा मेमोरिअल सेंटर)**
**(अणुऊर्जा विभाग, भारत सरकार अंतर्गत एक साहाय्यक अनुदानित संस्था)**
**परेल, मुंबई - ४०० ०१२**
**प्लॅटिनम ज्युबिली सेक्रेटरिएट**

**ऑनलाइन अर्जाची शेवटची तारीख : १७.०८.२०१७**

**पेशंट नेव्हिगेटर, सर्टिफिकेट कोर्स**
**'केव्हट प्रोग्राम'**


कर्करोग रुग्णांची वैद्यकीय चिकित्सेबरोबर मानसिक काळजी घेण्याकरिता प्रशिक्षित 'पेशंट नेव्हिगेटर्सच्या कार्यदलाची' निर्मिती करणे हा या पाठ्यक्रमाचा उद्देश आहे.

पाठ्यक्रमाचा कालावधी : ६ महिने, पूर्ण वेळ

पाठ्यक्रम शुल्क : १८,०००/- संपूर्ण पाठ्यक्रमाकरिता

अधिक तपशिलाकरिता https://tmc.gov.in या आमच्या संकेतस्थळाला भेट द्यावी.

**SSC/HSC विद्यार्थी असूनही**
**दरमहा 1 लाखाएवढे घसघशीत वेतन**
**हे तुमचे प्राधान्य आहे का?**
**हे शक्य आहे ह्याची खात्री बाळगा**
**TUV R NIFE च्या अग्नि व सुरक्षा कोर्सच्या साह्याने**



THEJUS
Salary: 1,70,000/-
HSE Consultant

SUBEESH S.
Salary: 1,25,000/-
Safety Officer

MOHD. SUFIYAN KHAN
Salary: 89,000/-
Safety Officer

MASOOM CHOUGLE
Salary: 75,000/-
Safety Officer

आमच्या शेकडो विद्यार्थ्यांनी हे करून दाखवले आहे. SSC/HSC पदवीच्या वेळी आमच्या शैक्षणिक अभ्यासक्रमात दाखल होऊन व पुढे नोकरीत रु. १ लाख दरमहापर्यंतचे वेतन मिळवून त्यांनी हे सिध्द केले आहे. हेच TUV RHEINLAND NIFE च्या अग्निशमन व सुरक्षा कोर्सचे अनोखे आकर्षण आहे. ह्या कोर्समुळे तुम्ही एका सामान्य SSC/HSC विद्यार्थ्यांच्या पातळीवरून विकसित होत एका नामांकित कंपनीचे सुरक्षा अधिकारी म्हणून एका अत्यंत मानाच्या पदाचे अधिकारी म्हणून ओळखले जाता.

TUV RHEINLAND NIFE अग्निशमन व सुरक्षा कोर्समुळे तुमच्या आयुष्यात हे परिवर्तन होते. आता, भारत सरकारने स्थान केलेल्या NSDC च्या मान्यतेमुळे तुम्ही अग्निशमन व सुरक्षा व्यवसायातले इतरपेक्षा वरचढ अधिकारी म्हणून ओळखले जाता. TUV RHEINLAND NIFE ही भारतातील NSDC मान्यताप्राप्त अशी अग्निशमन व सुरक्षा कोर्स शिकवणारी एकमेव संस्था आहे.

nebosh in association with Arbrit
25 YEARS OF EXCELLENCE
N·S·D·C National Skill Development Corporation
Transforming the skill landscape
TÜVRheinland® NIFE
TÜV RHEINLAND NIFE ACADEMY PVT. LTD.
www.nifeindia.com Follow us on /tuvrnife

THANE: 203, Lotus Plaza, Gokhale Road, Naupada Junction, Ice Factory Bus Stop, Thane West. | CHEMBUR: 5th Floor, Stellar Tower, Opp. K Star Mall, Dimond Garden, Chembur. | BORIVALI: 102, Bhakthi Apartment, Jambli Gali, Opp. Jain Mandir, Near Moksha Plaza Mall, Borivali West. | KALYAN: 1st Floor, Shree Apartments, Above Jahagirdar Bakery, Ahilyabai Chowk, Kalyan West.

Call: 9619298378

Admission open for Session 2017-18
Female Students can also Apply

**भाभा अणू संशोधन केंद्र**

**ई-निविदा मागविणारी सूचना**

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने साहाय्यक संचालक, अणुभट्टी गट, भाभा अणू संशोधन केंद्र, ट्रॉम्बे, मुंबई-४०० ०८५ यांच्याद्वारा सीपीडब्ल्यूडी, एमईएस, डीएईच्या मान्य सूचीवरील पात्र कंत्राटदार आणि खालील कामाकरिता तत्सम कामांच्या निष्पादनाकरिता पुरेसा अनुभव व शक्तता असलेल्या भारत सरकारच्या अन्य विभाग/उपक्रमातील कंत्राटदारांकडून याद्वारा ई-निविदा पद्धतीत खालील कामाकरिता ऑनलाइन बाब दर निविदा मागविण्यात आल्या आहेत.

| | |
|---|---|
| निविदा सूचना क्र. | **बीएआरसी/आरआरएमडी/टीएन-५३६/२०१७-१८ दिनांकित ४.८.२०१७** |
| कामाचे नाव | ध्रुव येथील २५० के व्हीए मोटार ऑल्टरनेटर सेटकरिता (२५० के व्हीए एमए सेट) कंट्रोल पॅनेलचा पुरवठा, प्रतिष्ठापन, एकात्मीकृत चाचणी व कार्यान्वयन |
| अंदाजित खर्च | रु. ६२,००,०००/- |
| इसारा रक्कम ठेव | रु. १,२४,०००/- |
| निविदा प्रक्रिया शुल्क | रु. ३६५८/- |
| पूर्तता कालावधी | ०९ महिने |
| ई-निविदा कागदपत्रांची (एक्सेल/वर्ड फॉरमॅट्स) खरेदी/डाऊनलोड करण्याकरिता कालावधी | १४.८.२०१७ ते २४.८.२०१७ (स. १०.०० ते दु. ४.००) |
| ई-निविदा ऑनलाइन सादरीकरणाची शेवटची तारीख व वेळ | २९.९.२०१७ |
| निविदा प्रक्रिया शुल्क व इरठेच्या अनुसार ई-प्रदानाची पावती, मूळ कागदपत्रांच्या सादरीकरणाकरिता शेवटची तारीख | २९.९.२०१७ (दु. ३.०० वा.) रोजी किंवा तत्पूर्वी |
| निविदा उघडण्याची तारीख व वेळ | २९.९.२०१७ रोजी दु. ३.३० वा. |

ई-निविदा सूचनेचा संपूर्ण तपशील http://www.barc.gov.in या बीएआरसीच्या संकेतस्थळावर पाहता येईल.

**साहाय्यक संचालक, अणुभट्टी गट**
(भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि करिता)

**Corrigendum to the Notice of the Extra Ordinary General Meeting**

We draw the attention of all the Members of TCPL Packaging Ltd (the "Company") towards the Notice dated 15.07.2017, convening Extra Ordinary General Meeting (EGM) of the Company (the "Notice") to be held on Wednesday, the 9th day of August, 2017 at 5.30 p.m. or immediately after the conclusion of 29th Annual General Meeting of the Company, whichever is earlier.

In the explanatory statement on page No 8 of the Notice, the particulars of beneficial owner in respect of the following Subscribers, as per SEBI circular No. CIR/MIRSD/2/2013 dated 24.01.13 should be read as follows :-

| Sr. No. | Details of Subscriber | Category / Class of Subscriber | Number of Equity Shares proposed to be allotted | Beneficial Ownership |
|---|---|---|---|---|
| 1. | V.E.C Indian Special Situations Master Fund Ltd Maples Corporate Services Limited, P.O. Box 309, Ugland House, Grand Cayman, KY11104, Cayman Islands Permanent Account Number AAFCV0725P | Foreign Portfolio Investor Category III | 59000 | The Beneficial Owners holding more than 25 % of the capital of V.E.C Indian Special Situations Master Fund Ltd are V.E.C Indian Special Situations Fund Ltd and V.E.C Indian Special Situations Fund LLC. The Beneficial Owner in respect of VEC Indian Special Situation Fund Ltd holding more than 25 % of the capital is ING Luxembourg / Septagon. There are no Beneficial Owners in ING Luxembourg / Septagon, who hold in excess of 25 % of shares or capital or profits as defined in clause 4 of SEBI Circular No. CIR/MIRSD/2/2013 dated 24.01.13. V.E.C Indian Special Situations Fund is Limited Liability Company (LLC). There are no Beneficial Owners in V.E.C Indian Special Situations Fund LLC, who hold in excess of 25 % of shares or capital or profits as defined in clause 4 of SEBI Circular No. CIR/MIRSD/2/2013 dated 24.01.13. The Directors of VEC Indian Special Situation Master Fund Ltd, V.E.C Indian Special Situations Fund Ltd and V.E.C Indian Special Situations Fund LLC are Ms. Cassandra Powell and Ms. Leanne Golding. |
| 2. | V.E.C Strategic Value Fund 51, Maker Chambers VI, Nariman Point, Mumbai 400 021 Permanent Account Number AACTV3980G | Alternative Investment Fund Category III | 41000 | V.E.C Strategic Value Fund is controlled by Vistra ITCL (India) Limited (trustee to V.E.C Alternative Investment fund – V.E.C Strategic Value Fund). There are no Beneficial Owners in Vistra ITCL (India) Limited (trustee to V.E.C Alternative Investment fund – V.E.C Strategic Value Fund), who hold in excess of more than 25 % of shares or capital or profits as defined in clause 4 of SEBI Circular No. CIR/MIRSD/2/2013 dated 24.01.13. The Directors of Vistra ITCL (India) Limited are Ms. Navita Yadav, Mr. Martin Crawford, Mr. Arjan Schaapma, Mr. Rajendra Kashyap, Mr. Debabrata Sarkar and Mr. B. Gopalakrishnan The investment decision in V.E.C Strategic Value Fund is taken by Mr. Rajendra Khatu, Director. |

Please note that there are no other modifications to the EGM Notice. This corrigendum should be read with the EGM Notice.

Place : Mumbai
Date : 08.08.17

For **TCPL Packaging Limited**
S G Nanavati
Executive Director
DIN:- 00023526

**TATA**

**TATA STEEL LIMITED**

**Registered Offce:** Bombay House, 24, Homi Mody Street, Fort, Mumbai - 400 001 India
Tel.: 91 22 6665 8282 • Fax No.: 91 22 6665 7724 • Email: cosec@tatasteel.com • Website: www.tatasteel.com
CIN: L27100MH1907PLC000260

**सूचना**

**३० जून, २०१७ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी अलिप्त वित्तीय निष्कर्षांचा सारांश**

रु. कोटी

| तपशील | ३०.०६.२०१७ रोजी संपलेली तिमाही | ३१.०३.२०१७ रोजी संपलेली तिमाही | ३०.०६.२०१६ रोजी संपलेली तिमाही | ३१.०३.२०१७ रोजी संपलेले वित्तीय वर्ष |
|---|---|---|---|---|
| | लेखापरीक्षित | लेखापरीक्षित | लेखापरीक्षित | लेखापरीक्षित |
| प्रवर्तनातून एकूण उत्पन्न | १४,४२१.७२ | १७,११३.१३ | १०.३२३.४८ | ५३,२६०.९६ |
| कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (कर आणि अपवादात्मक बाबींपूर्व) | १,४११,८७ | २,६९७.०६ | १,०९४.७० | ६,०६०.३१ |
| कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक बाबींनंतर) | ७९५.०८ | २,२५५.०० | ९३९.२३ | ५,३५६.९३ |
| कालावधीसाठी करोत्तर निव्वळ नफा/(तोटा) | ५०६.४५ | १,४१४.९६ | ५७५.४३ | ३,४४४.५५ |
| कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीसाठी (करोत्तर) नफा/(तोटा) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करोत्तर) धरून) | ३७७.३० | १,४३८.५६ | १,२१३.६१ | ४,१२०.३४ |
| भरणा झालेले समभाग भांडवल (दर्शनी मूल्य रू. १० प्रति समभाग) | ९७१.४१ | ९७१.४१ | ९७१.४१ | ९७१.४१ |
| पुनर्मूल्यांकित राखीव वगळून राखीव | | | | ४८,६८७.५९ |
| मूलभूत प्रति समभाग प्राप्ती (अवार्षिक)–रूपयांत (अपवादात्मक बाबींनंतर) | ४.७७ | १४.१२ | ५.४८ | ३३.६७ |
| सौम्यिकृत प्रति समभाग प्राप्ती (अवार्षिक)– रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर) | ४.७७ | १४.१२ | ५.४८ | ३३.६७ |

**३० जून, २०१७ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी एकत्रित वित्तीय निष्कर्षांचा सारांश**

रु. कोटी

| तपशील | ३१.०६.२०१७ रोजी संपलेली तिमाही | ३१.०३.२०१७ रोजी संपलेली तिमाही | ३०.०६.२०१६ रोजी संपलेली तिमाही | ३१.०३.२०१७ रोजी संपलेली वित्तीय वर्ष |
|---|---|---|---|---|
| | अलेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | लेखापरीक्षित |
| प्रवर्तनातून एकूण उत्पन्न | ३०,९७३.३३ | ३५,३०४.८९ | २५,९७०.७१ | ११७,४१९.९४ |
| कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (कर आणि अपवादात्मक बाबींपूर्व) | २,२९०.५४ | ४,३२७.८० | १,११७.५० | ६,७९७.८६ |
| कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक बाबींनंतर) | १,६७३.७५ | २५९.२१ | ९४९.७० | २,४७३.६३ |
| अखंडित प्रवर्तनातून करोत्तर निव्वळ नफा/(तोटा) | ९३३.२२ | (७१६.७५) | २०९.४३ | (३०४.३८) |
| खंडित प्रवर्तनातून करोत्तर निव्वळ नफा/(तोटा) | (१२.१३) | (४५१.२७) | (३,३९२.५०) | (३,८६४.१९) |
| कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीसाठी (करोत्तर) नफा/(तोटा) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करोत्तर) धरून) | (२,६२०.७१) | २२४.६० | (२,८२८.८८) | (४,७३१.६३) |
| भरणा झालेले समभाग भांडवल (दर्शनी मूल्य रू. १० प्रति समभाग) | ९७०.२४ | ९७०.२४ | ९७०.२४ | ९७०.२४ |
| राखीव (पुनर्मूल्यांकित राखीव वगळून) आणि अनियंत्रित व्याज | | | | ३६,१७५.७७ |
| प्रति समभाग प्राप्ती (अखंडित प्रवर्तनासाठी) : | | | | |
| मूलभूत प्रति समभाग प्राप्ती (अवार्षिक) – रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर) | ९.१७ | (७.८३) | १.७१ | (४.९३) |
| सौम्यिकृत प्रति समभाग प्राप्ती (अवार्षिक) – रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर) | ९.१७ | (७.८३) | १.७१ | (४.९३) |
| प्रति समभाग प्राप्ती (अखंडित आणि खंडित प्रवर्तनासाठी) : | | | | |
| मूलभूत प्रति समभाग प्राप्ती (अवार्षिक)–रूपयांत (अपवादात्मक बाबींनंतर) | ९.०४ | (१२.४८) | (३३.२६) | (४४.७७) |
| सौम्यिकृत प्रति समभाग प्राप्ती (अवार्षिक)– रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर) | ९.०४ | (१२.४८) | (३३.२६) | (४४.७७) |

**टिपा:**

ए) सेबी (लिस्टिंग अँड अदर डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजेसमध्ये सादर केलेल्या ३० जून, २०१७ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी अलिप्त आणि एकत्रित निष्कर्षांचे तपशीलवार विवरणाचा वरील माहिती हा एक सारांश आहे. ३० जून, २०१७ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी अलिप्त आणि एकत्रित निष्कर्षांचे संपूर्ण विवरण स्टॉक एक्सचेंजेसच्या वेबसाईटस्वर (www.nseindia.com/www.bseindia.com) आणि कंपनीचे वेबसाईट (www.tatasteel.com) वर उपलब्ध आहेत.

बी) सेबी (लिस्टिंग अँड अदर डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ५२(४) च्या उप-खंड (ए), (बी), (डी) आणि (ई) मध्ये उल्लेख केलेल्या बाबींसाठी, यथोचित माहिती एनएसई आणि बीएसई (www.nseindia.com/www.bseindia.com) येथे दिली आहे आणि ती युआरएल (www.tatasteel.com) वर पाहता येईल.

**टी. व्ही. नरेंद्रन**
मॅनेजिंग डायरेक्टर
भारत अँन्ड दक्षिण पूर्व आशिया
मुंबई : दिनांक : ७ ऑगस्ट, २०१७

**कौशिक चॅटर्जी**
ग्रुप एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर
फायनान्स, कॉर्पोरेट अँन्ड युरोप

**TATA STEEL**